चंदननगर पोलीस स्टेशन,पुणे शहर दि.२२/०४/२०१७

प्रेस नोट

## बडीकॉपच्या साहाय्याने आय.टी. महिला कर्मचाऱ्यांने केला दाखल छेडछाडीचा गुन्हा

बडीकॉप ही संकल्पना मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्रीमती रश्मी शुक्ला यांनी महीला सुरक्षितेसाठी पुणे शहरामध्ये सुरु केली आहे.यामध्ये आयटी कंपनीमधील काम करणाऱ्या महिलांसाठी त्यांच्या मदतीसाठी एक बडीकॉप म्हणुन पोलीस कर्मचारी देण्यात आला असुन सदर कर्मचारी संबंधित महिलेला पुर्णपणे मदत व मार्गदर्शन करणार आहे.यामुळे कोणत्याही महिलेला पोलीस मदत पाहिजे असल्यास संबंधित महिला निसंकोचपणे बडीकॉपव्दारे पोलीस मदत मागणार आहे. यासाठी मा.पोलीस आयुक्त सो.रश्मि शुक्ला,मा.पोलीस उप आयुक्त सो.,सायबर व गुन्हे शाखा.दिपक साकोरे,टेक्नीकल टीमचे पंकज घोडे व प्रणित कुमार यांनी आयटी कंपनीमध्ये जावुन महिलांना बडीकॉप बद्दल मार्गदर्शन केले होते व अजुनही आयटी कंपनीमध्ये जावुन महिलांना मार्गदर्शन करण्याचे काम सुरु आहे.

सध्या बडीकॉप चे कामकाज चंदननगर,हडपसर,हिंजवडी व येरवडा या पोलीस स्टेशनला सुरुवात करण्यात आली आहे.त्यानुसार संबंधित पोलीस स्टेशन मध्ये आयटी कंपनीमधील महिला कर्मचारी व पोलीस अधिकारी यांचे व्हॉटसअॅप ग्रुप बनविण्यात आले आहेत.एका बडीकॉप ग्रुपमध्ये ५० महिला कर्मचारी,संबंधित पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पोलीस उपनिरीक्षक व एक पोलीस कर्मचारी बडीकॉप म्हणुन समावेश आहे. पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संबंधित ग्रुपवर नियंत्रण करणार आहेत.**बडीकॉप संकल्पनेमध्ये कोणत्याही महिलेला सुरक्षेच्या/छेडछाडी प्रसंगी मदत पाहिजे असल्यास महिलेला पोलीस ठाणे मध्ये येवुन तक्रार देण्याऐवजी पोलीसंच तात्काळ मदत करण्यासाठी घटनास्थळी पोहोचणार आहेत हे बडीकॉपचे वैशिष्ट आहे.**

दिनांक २१/०४/२०१७ रोजी चंदननगर पोलीस स्टेशन येथे कॉन्स्ट्रीक्स कॉलसेंटर मधील मुलीने चंदननगर बडीकॉप व्हॉटसअॅप ग्रुप वर पोलीस मदत पाहिजे असलेबाबत

मेसेज केला असता चंदननगर पोलीस स्टेशनचे पोलीस उप निरीक्षक संदिप साळुंखे व स्टाफ यांनी संबंधित मुलीला फोन करुन विचारपुस केली व तात्काळ संबंधित महिलेच्या मदतेसाठी घटनास्थळी धाव घेतली. सदर ठिकाणी संबंधित मुलीची विचारपुस केली असता संबंधित मुलीने त्याच्या स्टाफमधील मुलगा नामे किशोर रामदास औटी वय-३० वर्षे रा. विशालदिप सोसा. शेजारी,हनुमान मंदिराजवळ, चंदननगर पुणे हा सदर मुलीला तु छान दिसतेस, तु मला आवडतेस असे म्हणत असल्याने, तसेच वेळोवेळी वेगवेगळे हावभाव, खाना खुना करत असल्याने त्याबाबत त्यास मुलीने विचारणा केली असता त्याने त्या मुलीस अपशब्द वापरले असलेबाबत मुलीने सांगितले.

सदर आरोपी हा त्याच कंपनीमध्ये कस्टमर सर्विस एक्झ्युकेटीव्ह म्हणुन काम करीत होता. यापुर्वी पिडीत महिला कर्मचाऱ्याने कॉन्स्ट्रीक्स कंपनी प्रशासनाकडे या बाबत तक्रार केली असता कंपनी प्रशासनाने आरोपी किशोर औटी यांस लेखी "सक्त ताकीद " दिलेली होती तरी देखील त्याच्या वर्तनामध्ये सुधारणा न होऊन पिडीत मुलीस छळण्याचे त्याने सुरुच ठेवले होते. सदर मुलीची त्याचठिकाणी तक्रार घेवुन सदर आरोपीस चंदननगर पोलीसांनी तात्काळ ताब्यात घेवुन त्यास अटक केली.सदर आरोपीवर भा.दं.वि.कलम ५०९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा तपास पो.उपनि.संदिप साळुंखे करीत आहेत.